## विद्यापीठाविषयी :

महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी सन १९१६ मध्ये श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठाची स्थापना केली. महिलांचा विकास आणि सबलीकरणाचा ध्यास असणाऱ्या, या विद्यापीठाला सन १९५१ मध्ये वैधानिक मान्यता मिळाली असून या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संबंध भारतभरात आहे.

एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाचाच एक विभाग म्हणून सन १९७९ पासून दूरस्थ शिक्षण केंद्र कार्यरत आहे. उच्च शिक्षणाच्या माध्यमातून महिला सबलीकरण या ध्येयाने हे केंद्र कार्यरत आहे. दूरस्थ शिक्षण विभाग प्रमाणपत्रे, पदविका आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम, विविध विषयात विद्यार्थिनींसाठी उपलब्ध करुन देतो. गेल्या काही वर्षात हजारो मुली, गृहिणी व नोकरदार महिलांना याचा फायदा झाला आहे. दहावी अथवा बारावी इयत्ता उत्तीर्ण नसलेल्या महिलांमध्ये शिक्षणाकरिता जागरुकता निर्माण करुन, त्यांना पारंपरिक शिक्षणाबरोबर व्यवसायाभिमुख शिक्षण देण्याचे प्रयत्न दूरस्थ शिक्षण विभाग आजवर करत आलेला आहे. गेल्या ३३ वर्षात ३ लाखापेक्षा अधिक महिलांना या शिक्षणाचा लाभ झाला आहे. या शिक्षणाचा फायदा महिलांना व्यावसायिक तसेच त्यांचा जीवनाचा स्तर उंचावण्यात होत आहे.

## दूरस्थ शिक्षण विभागाची ध्येये / वैशिष्टये :

१. महिलांना स्वयं-अध्ययनामार्फत उच्च शिक्षणासाठी प्रवृत्त करणे.
२. कमीत कमी १८ वर्षे वय असलेल्या महिला येथे पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेऊ शकतात.
३. कोठेही राहणाऱ्या महिलेला या विभागात प्रवेश दिला जातो.
४. नोकरदार महिलांना उच्च शिक्षणाच्या माध्यमातून शैक्षणिक व व्यावसायिक विकास साधण्यासाठी मदत.
५. महिलांसाठी एक शैक्षणिक स्रोताचे केंद्र म्हणून कार्य करणे.

## प्रमाणपत्र अभ्यासक्रम :
## ''स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला प्रतिनिधींचे नेतृत्व''

## प्रास्ताविक :

एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाच्या दूरस्थ शिक्षण विभागामार्फत स्थानिक स्वराज्य संस्थेत लोकप्रतिनिधी म्हणून काम करू इच्छिणाऱ्या महिलांसाठी प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करीत आहोत.

सन १९९३ साली ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक मान्यता मिळाली. या घटनादुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांत महिलांना प्रथमच ३३% आरक्षणामार्फत सत्तेत भागिदारी मिळाली आता हे आरक्षण ५०% झाले आहे. पण हा कायदा काही आपोआप झाला नाही. आपल्या देशात कर्तृत्ववान राजघराण्यातील कर्तृत्ववान स्त्रियांनी सत्ता राबविली. पण ते होतं हातांच्या बोटावर मोजण्याइतक्या स्त्रियासंबंधी. सर्वसाधारण महिला त्यापासून शेकडो कोस दूर होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गांधी-नेहरुंचा सामान्य महिलांना देशाच्या विकासात आपला वाटा उचलला पाहिजे हा आग्रह होता. पंचायत राज संबंधीची संकल्पना आपल्या राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वात नोंदून ठेवली होतीच. राज्यघटनेत हा बदल कसा झाला? महिलेला सत्तेमध्ये भागिदारी कशी व कशाकरिता मिळाली? हे प्रयत्न कोणी केले? हे समजून घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात अधिकाधिक माहिती तुम्हाला अभ्यासक्रमाच्या माध्यमातून मिळेल.

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कामाबद्दलची माहिती तुम्हाला आम्ही पुरविलेल्या अभ्याससाहित्यातून मिळेलच, त्याचबरोबर स्वतःचे व इतरांचे अधिकार समजून घेणे, त्याबद्दल आपणास आग्रह धरायला शिकविणे. तुम्ही निवडून जाईपर्यंत एक सामान्य महिला, पण निवडून आल्यावर एक सन्माननीय सदस्य व गावाच्या प्रतिनिधी बनता. फक्त आरक्षित जागेवर आलेली महिला नाही, तर तुमच्या माध्यमातून सर्व गावाला न्याय मिळेल अशीच तुमची भूमिका बनत जाईल. याच उद्देशाने या अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे.

या अभ्याक्रमाच्या निर्मितीत श्रीमती फौजिया खान, मान. शालेय शिक्षण राज्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांचे सहकार्य व मदत लाभली असून मान. प्रा. वसुधा कामत - कुलगुरु एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ यांच्या प्रयत्नातून हा अभिनव अभ्यासक्रम या विद्यापीठाच्या दूरस्थ विभागामार्फत प्रथमच राबविला जात आहे.

**अभ्यासक्रमांचा उद्देश :** या अभ्यासक्रमाअंती विद्यार्थिनी खालील गोष्टी करु शकतील.

१. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाचे ध्येय साधण्यासाठी विकास आराखडा तयार करण्यासाठी मदत.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्य क्षमतेत वाढ करण्यास मदत.

३. स्थानिक गरजांच्या परिपूर्तीसाठी, पंचायत/नगरपालिका शासनाचे नियोजन तसेच निर्णयाची अंमलबजावणी व देखरेख.

४. पंचायत संस्थाच्या विविध स्तरावरील निर्धारित कार्यपध्दतीत सुधार आणि क्षमतेत वाढ.

**प्रवेशाची पात्रता :** वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला लोकप्रतिनिधी.

**प्रवेश :** या प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी पंचायत राज संस्थामधील महिला लोकप्रतिनिधींना प्रवेश दिला जाईल. प्रवेशासाठी कोणतीही शैक्षणिक पूर्व अट नाही. प्रवेशाची सुरुवात प्रत्येक वर्षाच्या जून महिन्यात होईल.

**अभ्यासक्रमाचा कालावधी :** ६ महिने

**शुल्क :** रु. २,५००/-

**माध्यम :** मराठी

**विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शन :**

१. छापील अभ्यास साहित्य.

२. दृकश्राव्य माध्यमातील डी. व्ही. डी.

३. संपर्क व्याख्याने

**अभ्यासक्रमाचे घटक / पेपर :**

१. भारतातील पंचायत राज संस्थांची संकल्पना व इतिहास

२. निर्वाचित पंचायत प्रतिनिधींची सत्ता, जबाबदाऱ्या व कर्तव्य

३. निर्वाचित पंचायत प्रतिनिधींची क्षमता बांधणी आणि कौशल्ये विकास

४. ग्रामीण विकासाच्या योजना आणि कार्यक्रम

**परीक्षापध्दती :**

अ) **लेखी परीक्षा :** प्रत्येक पेपर ५० गुण, एकूण गुण २००

ब) **क्षेत्र अभ्यास** (field work) **:** २०० गुण त्यातील १५० गुण क्षेत्र अभ्यास अहवालासाठी व ५० गुण सादरीकरणासाठी.

क) संपूर्ण अभ्यासक्रमादरम्यानन विद्यार्थिनींच्या अभ्यासाचे मूल्यमापन सातत्याने केले जाईल.

**उत्तीर्णतेचे निकष :**

१) **लेखी परीक्षा :** ५० पैकी प्रत्येकी १८ गुण आवश्यक.

२) **क्षेत्र अभ्यास अहवाल :** १५० पैकी ८० गुण आवश्यक.

३) **सादरीकरण :** ५० पैकी २० गुण आवश्यक.

---


**अधिक माहितीसाठी संपर्क :**
संचालक, दूरस्थ शिक्षण विभाग,
श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठ
सर विठ्ठलदास विद्याविहार, जुहू रोड,
सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई - ४०० ०४९.
दुरध्वनी : २६६० ७७५८ / २६६० ८१९३ / २६६० ९८२९
फॅक्स : २६६० ४७५९
ईमेल : cdesndt@gmail.com
वेबसाइट : sndt.ac.in.



## दूरस्थ शिक्षण केंद्र
## श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठ
सर विठ्ठलदास विद्याविहार, जुहू रोड,
सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई - ४०० ०४९.




# प्रमाणपत्र अभ्यासक्रम :
# ''स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला प्रतिनिधींचे नेतृत्व''